MHSN150048612020

रे.दि.मु.नं.४०५/२०२०
(तुकाराम पवार वि.बबन पवार)

# निशाणी क्र.८६–अ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१-अ ते १-क यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत हुकूम रद्द होऊन दाव्याकामी कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

(२) प्रतिवादी क्र. १-अ ते १-क यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१-अ या वयस्क महिला असून मागील तारखेस आजारी असलेने सदर प्रतिवादी यांना हजर राहून दाव्यास कैफियत देता आली नाही. सदर प्रतिवादी आजरोजी या अर्जासोबत कैफियत दाखल करीत आहेत. प्रतिवादी क्र.१-अ ते १-क यांनी जाणूनबजून कैफियत उशिरा दिली आहे असे झाले नाही. प्रतिवादी क्र.१-अ ते १-क यांचे विरुध्द असा आदेश कायम राहिलेस त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विना कैफियत हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी निशाणी क्र.८६-अ वरील अर्जावरच म्हणणे सादर करुन प्रतिवादी यांचे अर्जातील मजकूर मान्य नसलेचे कथन केले. प्रतिवादी क्र.१-अ ते १-क यांचा सदरचा अर्ज व त्यातील कथने संयुक्तीक नाहीत. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक कैफियत देणेस विलंब केलेला आहे व दावा अंतिम युक्तीवादाकरीता असताना विलंबाने दिलेला सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(४) प्रतिवादी १-अ ते १-क यांचा निशाणी क्र.८६-अ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व निशाणी क्र. ८६-अ वरील वादी यांचे म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीबाबत दाखल केलेला आहे. प्रकरण आजरोजी अंतिम युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. सदरचे प्रकरण हे १२ वर्षे जुने आहे. प्रतिवादी क्र. १-अ ते १-क यांना दाव्याचे कामी समन्सची बजावणी होऊनदेखील ते मुदतीत कैफियत

व म्हणणे दाखल करु शकलेले नाहीत. म्हणून, नि.क्र.०१ वर दि.१६.०४.२०२५ रोजी विना कैफियतचा आदेश पारीत झालेला आहे. परंतु, प्रस्तुत दाव्याकामी या प्रतिवादींची कैफियत आल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रतिवादी क्र.१-अ ते १-क यांची कैफियत अभिलेखावर आले तर वादीचे काही नुकसान होणार नाही. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप विचारात घेता व प्रतिवादी क्र. १-अ ते १-क यांनी केलेला विलंब विचारात घेता सदरचा अर्ज भुर्दंडासहीत मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

प्रतिवादी क्र. १-अ ते १-क यांचा निशाणी क्र.८६-अ वरील अर्ज र.रु.५००/-(पाचशे रुपये फक्त) इतका भूर्दंड वादींना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.11.14 17:07:01 +0530

विटा. (श्रीमती. व्ही.डी.शिरसे)

दि.१२.११.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

विटा, ता.खानापूर, जि.सांगली.

MHSN150048612020

रे.दि.मु.नं.४०५/२०२०
(तुकाराम पवार वि.बबन पवार)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt. V. D.Shirse,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 12.11.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 12.11.2025 |
| Order uploaded on | :- | 14.11.2025 |